महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १४८ वा | दिनांक : ०६/०३/२०२५ | वार : गुरूवार

## सरपंच हत्या प्रकरणात धनंजय मुंडेंना सहआरोपी करा : सुप्रिया सुळे



**पुणे** : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात धनंजय मुंडे यांना सहआरोपी करा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. तसेच त्यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर पंकजा मुंडे यांनी घेतलेल्या भूमिकेचे देखील स्वागत केले.

पुणे जिल्ह्यातील पहिला टँकर पुरंदरमध्ये सुरू झाला आहे. पाणी टँकर उद्घाटन कार्यक्रमप्रसंगी सुप्रिया सुळे बोलत होत्या. यंदा पुरेसा पाणीसाठा आहे असे सरकारने सांगितले आहे. त्यामुळे प्रशासनाने व्यवस्थित पाणी वाटप करावे, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी त्यांनी माध्यमांशी बोलताना त्यांनी बीडमधील घटना आणि धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावरही भाष्य केले.

बीडमध्ये जे खून झाले आहेत, त्यांची फाईल पुन्हा उघडली पाहिजे, अशी मागणी मी कालच मुख्यमंत्र्यांकडे केल्याचे सुप्रिया सुळे यांनी सांगितले. धनंजय मुंडे यांनी जे वक्तव्य केले त्याचा मी जाहीर निषेध केला आहे. धनंजय मुंडे यांनी नैतिकतेचा न पण वापरला नाही, त्यांच्या पक्षात काय चालले आहे, हे त्यांनाच माहीत, असे त्या म्हणाल्या.

वाल्मिक कराडचे पीए धनंजय मुंडेंना भेटायला गेले आहेत. त्यावरुन हे नाते किती घट्ट आहे ते कळते. त्यामुळे, धनंजय मुंडेंना सहआरोपी करा अशी आमची मागणी असल्याचे सुप्रिया सुळेंनी म्हटले. तर, पंकजा मुंडे यांनी देशमुख कुटुंबाची माफी मागितली आहे, त्यांनी सुसंस्कृतपणा दाखवला, असे म्हणत सुप्रिया सुळे यांनी पंकजा मुंडेंच्या भूमिकेचे देखील स्वागत केले. खंडणी झाली, खून, हिंसाचार, शेतकरी यांची फसवणूक अजून काही राहिले का? कुठला गुन्हा राहिला आहे? असा सवालही सुळे यांनी केला. ज्यावेळी हा प्रकार झाला तेव्हा आरोपीला व्हीआयपी ट्रीटमेंट झाली, या लोकांमुळे महाराष्ट्र बदनाम होतोय, अशी टीका सुप्रिया सुळे यांनी केली.

समोर आलेल्या गोष्टी या भयंकर आहेत. लोकांनी विश्वासाच्या नात्याने सत्ता दिली. पण, त्यांनी कुठलाच गुन्हा सोडला नाही, अशा शब्दांत सुप्रिया सुळे यांनी हल्ला चढवला. कालचा राजीनामा यायला ८४ दिवस लागले. हे व्हिडीओ मधले फोटो आहेत. पीडित कुटुंबातील लोकांना काय वाटत असेल. अखेर स्वतःची नैतिकता महत्त्वाची असते, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

भाजप नेत्या आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याचे स्वागत केले. धनंजय मुंडेंचा राजीनामा फार आधीच व्हायला हवा होता. धनंजयने देखील आधीच राजीनामा द्यायला पाहिजे होता, असे त्या म्हणाल्या.

धनंजय मुंडेचा राजीनामा घेणाऱ्यांनी आधी घेतला असता, तर त्याला गरिमामय एक मार्ग मिळाला असता. खुर्चीवर बसून विचार करताना राज्याच्या प्रत्येकाच्या सारख्याचा विचार केला पाहिजे. संतोष देशमुखांच्या झालेल्या निर्घृण हत्येवर निषेध व्यक्त करताना मी मनापासून संतोष देशमुखांच्या आईची क्षमा मागते. संतोष देशमुखांच्या जीवाच्या, परिवारांच्या वेदनांपुढे हा निर्णय मोठा नाही. देर आए दुरुस्त आए, असे पंकजा मुंडे म्हणाल्या होत्या.

## हमाम में सब नंगे होते है..: विधानसभेत एकही आमदार राहू शकणार नाही, लक्ष्मण हाके

**पुणे** : महाराष्ट्रातील महायुती सरकारमधील अनेक अनेक मंत्र्यांवर विविध आरोप समोर येत आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरणी राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्यात आला आहे. तर माणिकराव कोकाटे यांच्यावरही टांगती तलवार आहेच. त्यात आता भाजपचे कॅबिनेट मंत्री जयकुमार गोरे यांनी महिलेचा विनयभंग केल्याचे प्रकरण समोर आले आहे. आता त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. मात्र, जयकुमार गोरे यांचे समर्थन ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केले आहे.

लक्ष्मण हाके म्हणाले, हमाम में सब नंगे होते है, जर जयकुमार गोरे यांचा राजीनामा मागत असतील, न्यायालयासमोर साक्ष देऊन राजीनामा मागत असतील तर महाराष्ट्रातील २८८ आमदारांचा राजीनामा घ्यावा लागेल, असे विधान त्यांनी केले आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेत एकही आमदार राहू शकणार नाही. आमदारकी आणि त्यातून पैसा ही पद्धत सुरू असून यातला कोणता आमदार खांदायला गेला होता का, अशा शब्दात लक्ष्मण हाके यांनी जयकुमार गोरे यांचे समर्थन केले आहे.

पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, न्यायालयासमोर माफी मागून त्यांना निर्दोष सोडले असेल तर पुन्हा त्यांचा राजीनामा मागणे चुकीचे आहे. मात्र, नेत्यांनी सार्वजनिक जीवनात वावरताना आचारसंहिता पाळणे गरजेचे आहे. लक्ष्मण हाके यांनी धनंजय मुंडे यांच्यावर देखील विधान केले आहे, पुरावे असतील तर धनंजय मुंडे यांना सहआरोपी करा, असे हाके यांनी म्हटले आहे.

दरम्यान, जयकुमार गोरे यांनी हंबीरराव मोहिते यांच्या घराण्यातील एका महिलेचा गोरे यांनी छळ आणि विनयभंग केला असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी गंभीर आरोप केले आहेत. संजय राऊत म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत जवळचे आणि लाडके मंत्री जयकुमार गोरे यांनी स्वारगेटसारखे प्रकरण केले आहे. ते एक विकृत मंत्री आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या घराण्यातील एका स्त्रीचा, मंत्री गोरे यांनी छळ आणि विनयभंग केला आहे, त्याची माहिती समोर आली आहे. ती महिला येत्या काही दिवसात विधान भवनासमोर उपोषणाला बसणार असल्याची माहिती आहे.

फडणवीस यांचे निकटवर्तीय असणारे कॅबिनेट मंत्री जयकुमार गोरे यांच्यावर एका महिलेला स्वतःचे विवस्त्र फोटो पाठवल्याचा आरोप झाला आहे. या महिलेने या प्रकरणी योग्य ती कारवाई झाली नाही, तर १७ मार्चपासून विधान भवनासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. यामुळे राजकीय वर्तुळात एकच हल्लकल्लोळ माजला आहे. पीडित महिलेने यासंबंधी राज्यपालांसह मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री व विरोधी पक्षांच्या नेत्यांना पत्र पाठवून मंत्री जयकुमार गोरे यांची हकालपट्टी करण्याची मागणी केली आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०६ मार्च २०२५

## विद्रोही कवी नामदेव ढसाळांच्या समर्थनात गुडलक चौकात कवितांचे वाचन करून सेन्सॉर बोर्डाच्या निर्णयाचा निषेध



**पुणे** : भारतीय चित्रपट सेन्सॉर बोर्डाने विद्रोही कवी, पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्याबद्दल केलेल्या अवमानकारक वक्तव्याच्या निषेधार्थ पुण्यात साहित्यिक, कवी यांनी एकत्र येत अभिनव पद्धतीने गुडलक चौकातील कलाकार कट्ट्यावर आंदोलन केले. 'नामदेव तुझा बाप' असे म्हणत नामदेव ढसाळ यांच्या कविता व लेखनांचे वाचन, आणि विद्रोही कवितांचे सादरीकरण करत सेन्सॉर बोर्डाच्या कोण नामदेव ढसाळ? या प्रश्नाला उत्तर दिले.

सम्यक साहित्य संमेलन, पुणेचे अध्यक्ष परशुराम वाडेकर यांच्या वतीने या अभिनव आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ गझलकार म. भा. चव्हाण होते. या आंदोलनात पुण्याच्या माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, राहुल डंबाळे, दंगलकार नितीन चंदनशिवे, प्रा.राजा भैलूमे, डॉ. निशा भंडारे, किरण सुरवसे, सागर काकडे, हृदमानव अशोक, रोहित पेटारे उर्फ मिर्झा, कला दिग्दर्शक संतोष सखंद, दीपक म्हस्के, कुमार आहेर, विठ्ठल गायकवाड, आनंद जाधव, आकाश सोनवणे, डॉ. शुभा लोंढे, नागेश भोसले यांच्यासह मान्यवर साहित्यिक, कवी सहभागी झाले होते.

म. भा. चव्हाण म्हणाले, नामदेव ढसाळ हे जागतिक साहित्यिक होते. ते जातीय साहित्यिक नाहीत. बहुजनांचे आग्रदुत होते ते. त्यामुळे एका साहित्यिकाला आपण विशिष्ट जातीत बंद करणे योग्य नाही.

नितीन चंदनशिवे म्हणाले, नामदेव ढसाळ यांची कविता ही नुसती कविता नव्हती तर ऑन ड्युटी २४ असणारी व्यवस्था होती. त्यांच्या कवितांनी केवळ पुस्तकात येवून स्थान मिळवलेले नाही. काही कविता लिहायच्या असतात, काही वाचायच्या असतात तर काही कविता या बोंबलायच्याच असतात. मराठी साहित्याला बोंबलायची सवय नव्हती ती सवय ढसाळ यांच्या साहित्याने लावली. मात्र आजच्या हेडफोन लावणाऱ्या पिढीला तो आवाजच ऐकायलाच येत नाही.

परशुराम वाडेकर म्हणाले, नामदेव ढसाळ कोण? असं म्हणत त्यांच्या कवितांवर आधारीत एका चित्रपटाला सेन्सॉर बोर्डाने परवानगी नाकारली. ढसाळांच्या कवितांपेक्षा आक्षेपार्ह चित्रीकरण आजकालच्या चित्रपटात पाहायला मिळत पण ते सेन्सॉर बोर्डाला दिसत नाही. ढसाळांनी आपल्या लेखणीतून कामगार, मजूर यांना केंद्रस्थानी ठेवून फुले, शाहू, आंबेडकरांचे विचार पसरवण्याचे काम केले. त्यांच्या कवितांची दाखल घेवून भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविले आहे. पण आज त्या सरकारला नामदेव ढसाळांचा विसर पडला आहे. ढसाळ यांची कविता प्रत्येकाच्या मनामनात पोचली आहे. गरिबांचा विद्रोह त्यांनी आपल्या लेखणीतून मांडला. त्यांच्या कविता मधील शिव्यांमध्ये ही प्रेम आहे.

दरम्यान, बुद्धगया येथे सुरू असलेल्या महाबोधी विहार मुक्ती आंदोलनाला पाठिंबा देण्याचा ठराव यावेळी मंजूर करण्यात आला.

## मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी ऑनलाईन व्यवहाराबाबत जागरूकता शिबीर संपन्न





**छत्रपती संभाजीनगर** : मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी या शाळेत दि.०५-०३-२०२५ रोजी सायबर विभागाचे पोलीस अधिकारी मा. श्री. ढगे साहेब व श्री. पाटील साहेब यांनी इंटरनेट, मोबाईल, कॉम्प्युटर, बँक व्यवहाराबाबत माध्यमिक विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण केली.

## घाटकोपरची भाषा गुजराती : भैय्याजी जोशी यांचे वक्तव्य

**मुंबई** : महाराष्ट्राच्या राजधानी मुंबईत मराठी माणूस आणि परप्रांतीय लोकांमध्ये अनेकवेळा भाषेवरून वाद होताना दिसतात. मुंबईमध्ये राहायचे असेल तर मराठी भाषा बोलावी लागेल असा आग्रह मराठी माणसाचा असतो तर काही परप्रांतीय मराठी बोलण्यास स्पष्ट नकार देतात. यावरून अनेकदा वाद झाले आहेत आणि काही भागात अजूनही होतात. त्यात आता आणखी भर पडली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते भैय्याजी जोशी यांनी मुंबईत येणाऱ्याला मराठी शिकलीच पाहिजे असे नाही, असे विधान केले आहे. त्यामुळे यावरून देखील वाद पेटण्याची शक्यता आहे.

मुंबई येथील विद्याविहार येथील एका कार्यक्रमात बोलताना संघाचे ज्येष्ठ नेते भैय्याजी जोशी म्हणाले, मुंबईत विविध राज्य, प्रांत आणि भाषा बोलणारे नागरिक राहतात. मुंबईत अनेक भाषा आहेत आणि घाटकोपरची भाषा गुजराती आहे, त्यामुळे मुंबईत येणाऱ्या प्रत्येकाला मराठी शिकलं पाहिजे असं नाही. त्यांच्या या विधानावर राजकीय वर्तुळात नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे त्यांनी हे वक्तव्य महाराष्ट्राचे मंत्री व भाजपचे आमदार मंगलप्रभात लोढा यांच्या समोरच केले आहे.

पुढे बोलताना भैय्याजी जोशी म्हणाले, मी मंगल प्रभात लोढा यांचे अभिनंदन करतो, आजच्या कार्यक्रमानंतर जाम साहेब यांचे सुद्धा नाव चर्चेत असेल. या ठिकाणी आल्यावर मला महाराणा प्रताप यांचे नाव डोळ्यासमोर आले. महाराणा प्रताप आणि अहिल्यादेवी होळकर यांच्याबद्दल आपण ऐकले आहे. ज्यांच्याबद्दल आज आपण ऐकले आहे, असे जाम साहेब सुद्धा आहेत. आपल्यातल्या अनेकांनी त्यांना पाहिले आहे. मुंबई ते कन्याकुमारी त्यांनी काम केले आहे. जामसाहेब यांचे नाव या संस्थेला आहे, हे आपल्यासाठी अभिमानास्पद आहे. बिर्ला मंदिर अनेक ठिकाणी आहेत, बिर्ला यांनी अनेक मंदिर बांधले पण आतमध्ये देवता कोण आहे, त्यात जाऊन पहावे लागते. चांगले जीवन साधनेमधूनच प्राप्त होते. अशा प्रकारची मधुरता त्यांच्या बोलण्यात होती, असे म्हणत भैय्याजी जोशी जोशी यांनी जाम यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.

ज्यांनी साधना फक्त भारत मातेसाठीच करण्याचा संकल्प केला, त्यांचा दायरा हा हिंदू धर्म आणि भारतमाताच राहिला आहे. हे कर्मशीलता फक्त एका कामासाठी नाही तर असे जाम साहेब योगी म्हणून असतात. छत्रपती शिवाजी महाराज असे एक मात्र राजा आहेत, ज्यांना श्रीमंत योगी म्हणतात. भारताच्या परंपरेत असे महापुरुष असतात असे महापुरुष स्वतःला अहंकारापासून मुक्त करण्यासाठी आपण जे कार्य करतो ते ईश्वराचा कार्य आहे असे म्हणतात. म्हणून हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा, असे शिवाजी महाराज म्हणायचे, असेही भैय्याजी जोशी म्हणाले.

पुढे भैय्याजी जोशी म्हणाले, संघाच्या शाखेत काम करणारा प्रत्येकजण ईश्वरी कार्य करत आहे. स्वयंसेवक नावाची ही शक्ती आहे, त्या शक्तीच्या रूपाने प्रत्येकजण काम करतो. जे स्वतःसाठी जगतात ते पशु समान असतात आणि दुसऱ्यासाठी जगतात ते खरे आयुष्य जगतात आणि त्यांनाच मनुष्य म्हणावे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०६ मार्च २०२५


# वसाहतवादी इतिहासलेखनातुन धर्माची बीजे रोवली : डॉ. अरविंद गणाचारी



**छत्रपती संभाजीनगर :** जेम्स मिल यांनी भारताचा इतिहास हा वसाहत म्हणून लिहला.त्यातुन त्यांनी भारताच्या इतिहासाची मांडणी हिंदू, बौध्द, जैन व मुस्लिम अशी केली. त्यामुळे इंग्रजांनी स्वतःला ख्रिश्चन असतांना सुध्दा त्यांनी ख्रिश्चन न म्हणता ब्रिटिश म्हणून घेऊन भारतीयांना धर्मांचे इतिहासलेखन करून धर्माची बीजे रोवली असे प्रतिपादन डॉ. अरविंद गणाचारी यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग व महात्मा फुले- आंबेडकर विचारधारा विभाग व संशोधन केंद्राच्या वतीने भारतीय इतिहास लेखनातील नवे: प्रवाह: कथानक व चर्चा या तीन दिवशीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे बीज भाषक म्हणून डॉ अरविंद गणाचारी होते.त्यांनी ब्रिटिशांच्या इतिहासलेखनाने भारतीयांना एक वसाहत म्हणून पाहिले. त्याप्रमाणे इतिहासलेखनाची पध्दतीने लेखन केले.त्यासाठी त्यांनी अनेक पुरावे उदाहरणसह दिले.

या परिषदेचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. वाल्मिकी सरवदे यांनी इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभागाचा दैदीप्यमान असा इतिहास सांगुन इतिहास विभागातील वस्तुसंग्रहालय हे विद्यापीठाचे वैभव असुन त्याचा फायदा जगभरातील अभ्यासक घेत आहेत असे प्रतिपादन केले. अध्यक्षस्थानी विभागाच्या विभागप्रमुख डॉ. पुष्पा गायकवाड यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत करून विभागातातील वेगवेगळ्या उपक्रमाची माहिती दिली. या वेळी महात्मा फुले - आंबेडकर विचारधारा विभाग व संशोधन केंद्राचे संचालक डॉ. सतिश दांडगे यावेळी प्रमुख उपस्थिती होती. या परिषदेच्या समन्वयक डॉ. बीना सेंगर यांनी ही परिषद आताच्या कालखंडात किती महत्त्वाची हे सांगुन परिषदेच्या आयोजनाची भूमिका मांडली.

या परिषदेमध्ये १५० अभ्यासकांची उपस्थित होते. १५ आंतरराष्ट्रीय अभ्यासकांनी अभाशी पध्दतीने शोध निबंध सादर केले. या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगाचे सुत्रसंचलन प्रियदर्शन हटकर यांनी केले, तर प्रमुख पाहुणे यांचा परिचय डॉ. संजय पाईकराव यांनी केला. या परिषदेला डॉ. वाय. एस. आलोने , डॉ. किशोर गायकवाड, डॉ. जास्वंदी वांबुरकर, डॉ. विजय रामदास हे प्रमुखांने उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. सोनाली म्हस्के, डॉ. राहुल बचाटे, रवि गव्हांदे, अश्विनी जोगदंड, डॉ. बळीराम पाईकराव, डॉ. अमोल कुलकर्णी, कुमार भंवर, सुधीर बलखंडे यांनी परिश्रम घेतले.

# जगण्यासाठीचा आदर्श पाठ म्हणजे इंटिमेट डेथ : अर्चना मुळे




**उदगीर (आनंत करदम), -** जन्म आणि मृत्यू हे आयुष्याचे दोन टोक आहेत. पुनर्जन्म किंवा अस्तित्व हे मृत्यूने लावलेला शोध आहे. जगणं समृद्ध असेल तर मृत्यू चांगला येतो. वर्तमानाच्या आशा, वेदनांचे मर्म, जीवनातील सुख- दुःख आणि मृत्यू यांच्यातला संवाद पुनर्स्थापित केले तर आयुष्यावरच प्रेम माणसाला जगण्याची प्रेरणा देत. खरे आयुष्य जगण्यासाठीचा आदर्श पाठ घालून देणारी साहित्य कृती म्हणजे इंटिमेट डेथ हि होय. असे मत अर्चना मुळे, सांगली यांनी व्यक्त केले.

श्रुतिका बिपिन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गतच्या महिला दिन विशेष ३३२ व्या वाचक संवादामध्ये सांगली येथील सुप्रसिद्ध समुपदेशक अर्चना मुळे यांनी डॉ. मारी डी हेनेझेल लिखित इंटिमेट डेथ या साहित्यकृतीवर सुंदर असा संवाद साधताना त्या म्हणाल्या की, मृत्यू हे एक फार मोठे रहस्य आहे. मृत्यूमुळेच आयुष्याला मोल येत.

मृत्यूला नाकारण्यापेक्षा त्याला जीवनाचा एक भाग बनवला पाहिजे. कारण मरणासन्न व्यक्ती आपल्या वेदना, निराशा सहवासातील व्यक्तीकडे व्यक्त करतो. या पुस्तकात लेखकाने वर्तमान पुन्हा सादर करून आमच्या जाणिवेतून निसटलेल्या विषयांच्या आणि काळाच्या दूरवरच्या कक्षा, वेदना आणि त्यांचे मर्म, दुसऱ्यांचे दुःख, जीवन आणि मृत्यू यांच्यातला निरंतर संवाद यासाठी वर्तमान पुन्हा सांगण्याचा प्रयत्न केलाय. याबरोबरच मरणासन्न रुग्णांशी टिकवून ठेवलेला संवाद या पुस्तकातून सादर केलेला आहे.

यानंतर संपन्न झालेल्या चर्चेत, वर्षा वैद्य, उषा तोंडचिरकर, प्राचार्य विजयकुमार पाटील, सुरेश विश्वब्रह्मा, प्रतिभा मुळे, प्रा.डॉ. म.ई.तंगावार, डॉ. कांत जाधव यांचे सह अनेकांनी सहभाग नोंदवला. यावेळी जि.प.प्रा. शाळा, डिग्गोळ येथे सहाव्या वर्गात शिकणारी बाल वाचक कु.मानवी बिरादार हिने वाचलेल्या छत्रपती शिवाजी महाराज या कृष्णा केळुसकर लिखित पुस्तकाबद्दल माहती सांगितली.

अध्यक्षीय समारोप करताना श्रुतिका पाटील म्हणाल्या की, हे पुस्तक नवीन कोणता विचार मांडत नाही तर मानवी जीवनातल्या सर्वात समृद्ध अनुभवाचे प्रत्यक्षदर्शी कथन करतो. आपण मरणाकडे वस्तुनिष्ठपणे कसे पाहायला शिकलं पाहिजे याबाबत भाष्य केल्या.

शासकीय दुध डेअरीच्या सभागृहात संपन्न झालेल्या या वाचक संवादचे सूत्रसंचालन कु.डॉ. चंद्रभागा सुरेश शिंदे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय अर्चना नळगीरकर यांनी करून दिला तर आभार सुचिता अनंतराव कदम यांनी मानले. या कार्यक्रमास परिसरातील अनेक डॉक्टर, वकील, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, साहित्यिक, व्यापारी-वाचक रसिकांसह बालगोपाळ, स्त्री पुरुष मोठ्या संखेने उपस्थित होते

## उमरगा येथील महाआरोग्य शिबिरात दहा हजार रुग्णांच्या तपासणीसह औषधोपचार



**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भाजपा युवानेते शरण पाटील यांचे पुढाकारातून आयोजित दोन दिवसीय विभागीय महाआरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद.

या शिबिरात लातूर, धाराशिव जिल्ह्यातील दहा हजार पाचशे विविध आजाराच्या रुग्णांची तपासणी व औषधोपचार करण्यात आले.येथील आदर्श महाविद्यालयाच्या प्रांगणात मंगळवारी माजी केंद्रीय मंत्री भगवंत खुबा यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आले. जिल्हाधिकारी किर्ती कुमार पुजार अध्यक्षस्थानी होते.

जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, प्रदीप राठी (लातूर), जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सुरेश बिराजदार, श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विनायकराव पाटील, सचिव रामकृष्णपंत खरोसेकर, उपविभागीय अधिकारी गणेश पवार, तहसीलदार गोविंद येरमे, व्यंकटउमरगा येथे आयोजित महाआरोग्य शिबीराच्या शुभारंभप्रसंगी उपस्थित मान्यवर मंडळीलामजणे, ॲड. अभय चालुक्य, डॉ. अनंत मुगळे यांच्यासह आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना माजी केंद्रीय मंत्री खुबा म्हणाले, शरण पाटील यांनी माजी राज्यमंत्री बसवराज पाटील आणि बापूराव पाटील यांच्या सामाजिक व राजकिय कार्याची परंपरा कायम ठेवली आहे. शरण पाटील यांच्या पुढाकारातून आयोजित महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून विविध आजाराच्या दहा हजार रुग्णांना आधार मिळाला. केंद्र व राज्य सरकार सामान्य जनतेसाठी सुरू केलेल्या विविध योजनांचा लाभ घेण्याचेआवाहन केले.

शिबिरांतर्गत लाभार्थीना स्वाभिमान भारत या योजनेचेची नोंदणी करून देण्यात येत आहे. पाच मार्चला महा रक्तदान शिबिरात रक्तदान करून गरजू रुग्णाला जीवनदान देण्यासाठी रक्तदान करावे असे आवाहन केले. शरण पाटील फाउंडेशनच्या लोगोचे विमोचन करण्यात आले.या महाआरोग्य शिबिरात विविध आजारांवरील मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचे पाटील यांनी सांगितले. प्रा. डॉ.शौकत पटेल, प्रा.डॉ. लक्ष्मण बिराजदार यांनी सूत्रसंचालन केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०६ मार्च २०२५


# फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची ९७ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न













## समाजाला नेतृत्व प्रदान करण्याची जबाबदारी असलेले नेतृत्वहीन झाल्याने समाजाची दुरावस्था झाली आहे. __ बी. बी. मेश्राम

**छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी)** : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) यांच्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे "चळवळीचा फायदा सर्वांनाच झाला आहे. म्हणून स्वराज्यात अस्पृश्य (भारतीय) जनतेला समान हक्काने राहता आले पाहिजे." या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दोन्ही विधानाच्या 94 व्या व 89 व्या वर्धापनदिनानिमित्त सदरील विषयावर 97 वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा 2 मार्च 2025 ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, 29 फेब्रुवारी 1936 ला पनवेल येथे राघोजी वनमाळी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सभेत बादशहा पंचम जॉर्ज यांच्या निधनाबद्दल दु:ख व नवे बादशहा आठवे एडवर्ड यांचे अभिनंदन, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास तर येवले मुक्कामी घेतलेल्या धर्मांतरास पाठिंबा व्यक्त करणारे तीन ठराव पास करण्यात आले होते.

दुसऱ्या दिवशी संपन्न झालेल्या परिषदेत माझी चळवळ अमूक एका वर्गाची किंवा जातीच्या उन्नतीसाठी नसून सर्वांसाठी असल्याने चळवळीचा फायदा सर्वांनाच झाला आहे. असे बाबासाहेब म्हणाले होते.

करिता भारताचे संविधानाने प्रदान केलेल्या हक्क अधिकाराची अंमलबजावणी करताना सर्व नागरिकांमध्ये समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. म्हणून आपण या ऐतिहासिक विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त चर्चा करीत आहोत. समाजातील सर्व नागरिकांत समता प्रतिबिंबित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्यानुसार बुद्धिष्ट सेमिनरी अंतर्गत जगातील सर्व धर्माचा तौलनिक अभ्यास करून सामायिक मानवतावादी, वैज्ञानिक मुल्यावर समाजाला वळविले पाहिजे. जेणेकरून, जनता धर्माला नव्हे! तर मानवतावादी मूल्यांना अंगिकृत करून सर्व समावेशक जीवन व्यथित करायला तयार होईल. परिणामी अंधश्रद्धा युक्त पाखंडवादी मुखवटे गळून पडतील. ज्यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोनातून समाजाची निर्मिती होऊ शकेल.

नेतृत्वहीन समाजाला नेतृत्व प्रदान करण्याची जबाबदारी असलेले सुद्धा नेतृत्वहीन झाल्याने समाजाची दुरावस्था होत चालली आहे. अशावेळी परिवर्तनवाद्यांनी केंद्र व राज्य सरकारने अर्थसंकल्पात या देशातील अनुसूचित जाती, जनजाती व इतर मागासवर्गीयांच्या उत्थानासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात तरतूद केली आहे काय? आणि तशी अंमलबजावणी होते काय? शेड्युल्ड कास्ट सब प्लॅन व शेड्युल्ड ट्राईब सब प्लॅन ची स्थिती तपासून तशी व्यवस्था, तरतूद इतर मागासवर्गीयांसाठी करता येईल काय? याकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. तरच समतामुलक समाज स्थापित होऊ शकेल. करिता कमाल सामायिक मुद्यावर एकत्रित येऊन लढा दिला पाहिजे. जेणेकरून सर्व भारतीयांना या देशात आनंदी जीवन जगता येईल.

उद्‌घाटनपर मार्गदर्शन करताना समाधान ओंकार इंगळे म्हणाले की, 1884 पासून भारतीय स्वातंत्र्याच्या मागणीने जोर धरला ज्यामुळे काही हक्क अधिकार मिळायला सुरुवात झाली होती. अस्पृश्यांना समान अधिकार मिळावेत आणि अस्पृश्यता पाळणा-यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत. संसदीय लोकशाहीत बहुसंख्यांकांना महत्त्व असले तरी अल्पसंख्याकांची गळचेपी होणार नाही याची दक्षता बाळगली पाहिजे. हुकुमशाही राज्यात समानतेला थारा नसतो. पूर्वग्रहदूषित भावनेने समता स्थापित होणे शक्य होत नाही.

आजही अस्पृश्यांचे स्पर्श झालेल्या स्थळांचे शुद्धिकरण केले जाते, एवढी भयानक परिस्थिती आहे. कटने आणि बटने जोपर्यंत राहील, तोपर्यंत विकास होणार नाही. उपकाराची जाणीव ठेवून कृतज्ञ असणाऱ्यामुळे समाज विकसित होतो. मात्र उपकाराची जाणीव विसरणा-या कृतघ्न लोकांमुळे समाज विनाशाकडे वाटचाल करीत असतो.

दलित नहीं, बौद्ध कहो। चे लेखक प्रमुख वक्ते अनिलकुमार सोनकामळे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोलमेज परिषदेतून मिळवून आणलेल्या हक्क अधिकारातील स्वतंत्र मतदारसंघाची मागणी धुडकावून लावल्याने राजकीय आरक्षण पुढे आले. सत्तेचा सदुपयोग काय असतो? याचे महान उदाहरण म्हणजे मायावती, कांशीराम होय. दलित म्हटल्याने आपण अल्पसंख्याकात विभाजित होतो. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराला पुढे घेऊन जाण्यासाठी आपण स्वतःला बौद्ध म्हटले पाहिजे. जगात 44 बौद्ध राष्ट्रे आहेत. महाबोधी विहार ब्राह्मणाच्या तावडीतून मुक्त केले पाहिजे.

याप्रसंगी अशोक मेश्राम म्हणाले की, नामदेव ढसाळ यांच्या बाबतीत सेन्सॉर बोर्डाने घेतलेली भूमिका निषेधार्ह आहे. नवीन संसदेच्या उद्‌घाटन प्रसंगी देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांना सुद्धा बोलाविण्यात आले नव्हते, म्हणजे किती भयानक परिस्थिती आहे. उद्योजक दिगंबर गायकवाड म्हणाले की, प्रस्थापितांच्या प्रवाहाला बळी न पडता आपण आपल्या विचारावर ठाम राहिले पाहिजे. टी. एन. थोरात म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांसह मुस्लिम समुदायाचा सुद्धा विचार केला होता.

प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, वर्णव्यवस्थेवर आधारित जिना विरहीत इमारत नष्ट केली पाहिजे. शूद्रांना शिक्षा आणि रक्षा नाकारल्याने झालेली हानी भरून काढण्याची भारताचे संविधानात तरतूद करण्यात आली आहे. जनतेच्या हितासाठी बाबासाहेब आंबेडकरांनी जनता व समता ही वृत्तपत्रे चालविली. असमान लोकांना समान पातळीवर आणण्यासाठी तरतूद करून अंमलबजावणी केली पाहिजे.

प्रतीक पंचशील म्हणाले की, 27 ऑक्टोबर 1956 च्या प्रबुद्ध भारतच्या दीक्षा विशेषांकात, दीक्षा विधीस लोटलेला दलित जनतेचा महासागर असे म्हटले आहे. यावेळी दरेकाने दरेकाला दीक्षित करण्याचा महान अधिकार देण्यात आला होता. उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, येथे येणारा प्रत्येक व्यक्ती केवळ ऐकतो असे नाही तर तो व्यक्त होऊन उपाययोजना सुद्धा सांगतो, ही जमेची बाजू आहे. संजय बन्सवाल म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दीक्षा दिल्यावर आपण बौद्ध धर्माचे पाईक झालो आहोत. साडी-माडी-गाडी यातून बाहेर पडून चळवळीची ज्वाला प्रज्वलित ठेवून मार्गक्रमण केले पाहिजे. प्रवीण जमदाडे म्हणाले की, अनुसूचित जातीचे अ-ब-क-ड वर्गीकरण होऊ नये यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सुत्रसंचालन महादेव डांबरे, प्रास्ताविक एड. विलास रामटेके व आभार मिलिंद बागूल यांनी व्यक्त केले. यावेळी टी. एन. थोरात यांनी गोदातीरी पडला तरी लढला सैनिक माझा, उघडलाच नाही काळ्या रामाचा दरवाजा। हे गीत म्हटले तर गोविंद कांबळे यांनी 'चला भीमा मुळे झालो मोठा, खिशात मावेना नोटा' हे गीत सादर केले. प्रा. शिवम गायकवाड यांचे नेट, सेट, पेट उत्तीर्ण झाल्याबद्दल गुलाबपुष्प देऊन अभिनंदन करण्यात आले. या कार्यशाळेला उद्योजक मिलिंद बागूल, प्रा. शिवम गायकवाड, महादेव डांबरे, टी. एन. थोरात, अनिलकुमार सोनकामळे, संजय बन्सवाल, एस. ओ. इंगळे, प्रतीक पंचशील, गोविंद कांबळे, रमाबाई कांबळे, साधू आनंद, अशोक मेश्राम, प्रवीण जमदाडे, एड. विलास रामटेके, बी. बी. मेश्राम, दिगंबर गायकवाड इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.


शब्दांकन :

**बी. बी. मेश्राम,**

संचालक : फुले शाहू
आंबेडकराईट स्टडी सर्कल,
छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र.
संपर्क : 9421678628
stdbbm@gmail.com



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002